**DISTRICT AND SESSIONS COURT, JALNA**

Survey No - 488, Bypass Road, Jalna 431203

Web-https://jalna.dcourts.gov.in/ Email - mahjaldc@mhstate.nic.in

जिल्हा न्यायालय जालना/संगणक/ निविदा/२०२६ दिनांक :- ३०/०७/२०२६

# जाहीर निविदा

जिल्हा व सत्र न्यायालय जालना आस्थापनेसाठी अत्यंत तातडीने खालीलप्रमाणे नमुद अटी व शर्तींच्या अधीन राहून ६०० व्हीए युपीएस पुरविणेसाठी दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | तपशील | कंपनीचे नांव | संख्या |
|---|---|---|---|
| १ | ६०० व्हीए क्षमतेचे २ वर्ष वारंटीसह युपीएस | Microtech/Zebronics/ iball/V-Guard | १० |

सदरबाबत पुरवठाधारकाने निविदा या मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश जालना यांचे नांवे अग्रेषित मोहरबंद लखोटयात दिनांक ०६-०८-२०२६ रोजीपर्यत (सुटीचे दिवस वगळून) कार्यालयीन वेळेपर्यत म्हणेजच सांयकाळी ६:०० वाजेपर्यत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, जालना या कार्यालयात सादर कराव्यात. तद्नंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकाचा प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही.

सदर निविदा/दरपत्रक सीलबंद लखोटयावर "६०० व्हीए युपीएस (२ वर्ष वारंटीसह) साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा. हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखून ठेवत आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा/दरपत्रक सीलबंद लखोटयावर "६०० व्हीए युपीएस (२ वर्ष वारंटीसह) साठी वार्षिक करार करणेबाबत दरपत्रक" असा ठळक अक्षरात उल्लेख करावा.

२. दरपत्रकातील/ निविदेमधील नमूद दर हे सर्व करांसहित तसेच युपीएस प्रस्थापित करणेसह आणि पडताळणीसह नमूद करावेत. तसेच दरपत्रकात युपीएस वॉरंटी कालावधी स्पष्ट नमूद करावा.

३. निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश पारित झाल्यानंतर दरपत्रकात नमूद दराशिवाय कोणताही जास्तीचा दर आकारता येणार नाही.

४. निविदा मंजूर झाल्यानंतर व आदेश निर्गमित केल्यानंतर युपीएस जिल्हा न्यायालयामध्ये मध्ये प्रस्थापित करुन द्यावे लागतील व त्याची पडताळणी करुन द्यावी लागेल. सर्व पडताळणी झाल्यावरच जिल्हा न्यायालयामार्फत सदरील देयकाची अदायगी करण्यात येईल. तसेच प्रशासकीय कारणास्तव देयक अदा करण्यास विलंब झाल्यास कोणताही विलंब आकार किंवा व्याज देय राहणार नाही.

५. युपीएस हे उक्त नमूद कंपनीचे ओरिजनल (मूळ) व दर्जेदार असावेत.

६. प्रत्येक पुरवठाधारकाने फक्त एकच दरपत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

७. पुरवठा करण्याबाबतचे आदेश दिल्यानंतर युपीएस ३ दिवसाच्या आत जिल्हा न्यायालयास पुरवावे लागेल.

८. वारंटी कालावधीत युपीएस निकामी झाल्यास ते बदलून देण्यासाठी पाठविणे किंवा परत मागवून घेणे याबाबतचा ट्रान्सपोर्ट खर्च जिल्हा न्यायालय करणार नाही. तो खर्च संबंधित पुरवठाधारक यांना करावा लागेल.

९. युपीएस वॉरंटी कालावधीत तक्रार नोंदविल्यानंतर ४८ तासांच्या आत पुरवठाधारकास युपीएस दुरुस्त / बदलून द्यावे लागेल त्यासाठी कोणत्याही प्रकारची अतिरिक्त दर आकारता येणार नाही.

१०. सदरहु दरपत्रकातील सुचना कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही टप्यावर, कोणत्याही क्षणी अथवा संपूर्णतः वगळण्याचे अधिकार जिल्हा न्यायालयाने राखून ठेवले आहे.

११. सदर करार होण्याच्या अगोदर कोणत्याही टप्यावर दरपत्रक रद्द करणे / बदल करणेचा अधिकार खरेदी सल्लागार समिती, जिल्हा न्यायालय जालना यांना राहील.

१२. पुरवठा आदेशानुसार पुरवठा न केल्यास किंवा अटीचे उल्लंघन केल्यास काणेत्याही टप्यावर कोणत्याही क्षणी कुठलीही सबब न देता पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार जिल्हा न्यायालय जालना यांना राहील.

१३. दरपत्रक लिफाफामध्ये खालील कागदपत्रे सादर करावीत..

पॅनकार्डची प्रत, जीएसटी नोंदणी प्रमाणपत्र.

१४. सदरची जाहिरात जिल्हा न्यायालय जालनाच्या संकेतस्थळावर (https://jalna.dcourts.gov.in) वर प्रसिध्द करण्यात येईल.

१५. निविदाधारकांनी दरपत्रके/ निविदा जिल्हा न्यायालय जालना येथे दिनांक ०६-०८-२०२६ रोजीपर्यंत (सुटीचे दिवस ) सायंकाळी ६-०० वाजेपर्यंत पाठविणे आवश्यक आहे. त्यानंतर आलेल्या निविदेचा विचार केला जाणार नाही.

आदेशावरुन

30/7/2026

दिनांकः- ३०/०७/२०२६

प्र. प्रबंधक
जिल्हा न्यायालय जालना.